F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६/४८७

ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**तात्काळ: रजिस्टर एडी/ई-मेल द्वारे**

क्र.१८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२१-२२/ ४०६

दिनांक : २९/०९/ २०२१

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजनांची सन २०२१-२२ साठीच्या अंमलबजावणीबाबत....**

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र File No. AICTE/StDC/Pragati & Saksham/२०२१-२२ dated २६.०८.२०२१

उपरोक्त विषया संबंधी कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **प्रगती व सक्षम शिष्यवृत्ती योजनांच्या** महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता **तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना सन २०२०-२१ पासून नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर दोन्ही योजनांची माहिती खालीलप्रमाणे,

## अ) प्रगती शिष्यवृत्ती योजना ::

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मंजूरी असलेल्या संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये (पदविका, पदवी) शिकणाऱ्या **विद्यार्थीनीं साठी** प्रगती शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखापर्यंत** असावे **व** एका कुटूंबातील **केवळ दोन मुलींना** सदर योजना लागू राहील.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी केंद्र शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचा संच निर्धारीत करण्यात आला आहे.

- **नविन संच / कोटा (Quota) :-**

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | ६२४ |
| | २ | पदवी | ५५३ |

• शिष्यवृत्ती रक्कम :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| अ | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु. ५०,०००/- प्रति वर्ष |

## ब ) सक्षम शिष्यवृत्ती योजना ::

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मंजूरी प्राप्त संस्था व तांत्रिक अभ्यासक्रमांमध्ये ( पदविका, पदवी ) शिकणाऱ्या **विशेष दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी** सक्षम शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेकरीता **कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित ) रुपये ८.०० लाखापर्यंत** व **दिव्यांगाचे प्रमाण ४०% किंवा त्यापेक्षा अधिक असावे** असे निश्चित करण्यात आलेले आहे.

• नविन संच / कोटा ( Quota ) :-

| राज्य | अ.क्र. | अभ्यासक्रम | संच संख्या |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १ | पदविका | सर्व पात्र |
| | २ | पदवी | सर्व पात्र |

• शिष्यवृत्ती रक्कम :-

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे घटक | एक रक्कम ( Lump sum Amount ) |
|---|---|---|
| ब | संस्थेला देय असणारे शुल्क, संगणक स्टेशनरी, पुस्तके, यंत्रसामुग्री, सॉफ्टवेअर इ. | रु. ५०,०००/- प्रति वर्ष |

उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे संकेतस्थळ www.aicte-india.org वर देण्यात आलेली आहेत.

सदर योजनांची मंजुर रक्कम केंद्र शासनाकडून डीबीटी (Direct Benefit Transfer) अंतर्गत थेट मंजूर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.

सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलद्वारे ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात. सन २०२१-२२ करिता सदर योजनेच्या लाभासाठी **सन २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात नव्याने प्रवेशित** विद्यार्थ्यांनी **नवीन** ( Fresh ) अर्ज व **सन २०२०-२१ मध्ये शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र** विद्यार्थ्यांनी **नूतनीकरण** ( Renewal ) अर्ज NSP पोर्टलवर खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन अर्ज करावे व संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेल्या अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करावी.

| नवीन व नुतनीकरण अर्ज भरण्याचे व तपासणीचे वेळापत्रक :: शै. वर्ष २०२१-२२ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम दिनांक |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | **३० नोव्हेंबर, २०२१** |
| २ | संस्थांनी प्राप्त अर्जांची ऑनलाईन तपासणी ( मंजूर / नामंजूर ) करण्याचा अंतिम दिनांक | **१५ डिसेंबर, २०२१** |
| **टीप —** वेळापत्रकातील बदल केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ -www.scholarships.gov.in ) वेळोवेळी जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. | | |

तरी सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना उपरोक्त योजनांबाबत सुचित करण्यात यावे तसेच संस्थांनी एनएसपी पोर्टलवरील संबंधित योजनांसाठी प्राप्त लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Profile अद्ययावत करण्याबाबत व पात्र विद्यार्थ्यांना संबंधित योजनांची माहिती देण्याबाबत कळविण्यात यावे.

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.

**प्रत -** मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय , मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.